## प्रकरण दुसरे

दलित साहित्याचे प्रेरणास्थान

जीवनवादी दलित साहित्य

दलित साहित्य : कलात्मक दस्तऐवज

दलित साहित्य : वाङ्मय प्रकार

दलित साहित्यिकांची साहित्य विषयक भूमिका

संदर्भ, टीपा इ.

---

## प्रकरण दुसरे

## दलित साहित्याचे प्रेरणास्थान

---

दलित साहित्याचे एकमेव प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहे. त्यांनी मांडलेल्या विचारातून दलित साहित्याची तात्त्विक बैठक सिध्द झालेली आहे. दलित साहित्यातून प्रकट होणारी जीवनदृष्टी आणि प्रवृत्ती वैचारिक पातळीवरून मांडण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. डॉ.आंबेडकर हेच खरे थोर साहित्यिक होते. त्यांची स्फूर्तिदायक जीवनगाथा, त्यांनी आपल्या ग्रंथात सांगितलेले मूलगामी क्रांतिकारी तत्वज्ञान हेच दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहे. स्फूर्तिस्थान आहे.

आजच्या दलित साहित्यातील दु:ख,चीड, संताप, नकार, विद्रोह आणि मुक्तिसंग्राम हे सर्वच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनगाथेत , त्यांच्या विचार-धनांत,त्यांच्या ग्रंथात आणि त्यांच्या जीवनातील कृतिकार्य, आंदोलनात सर्वत्र आलेले आहे. म्हणून शंकरराव खरात या संदर्भात म्हणतात की[1], " आजच्या दलित साहित्यिकांनी लेखकांनी आपल्या काव्य,कथा,

कादंबऱ्या, नाट्य आणि इतर लेखनाला बाबासाहेब यांच्या जीवनाचा, जीवनगाथेचा, आंदोलन कार्याचा खडका सारखा आधार घेतला असून त्याचे विचार व तत्वज्ञान दीपस्तंभासारखे त्यांना मार्गदर्शक ठरले आहेत."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित वाङ्मय ही शक्ती निर्माण झाली आहे. दलित वाङ्मय म्हणजे केवळ ललित वाङ्मय नव्हे तर सगळ्या ज्ञानशाखा आपल्या कवेत घेणारे वाङ्मय होय. डॉ. आंबेडकरांची प्रतिष्ठापना या वाङ्मयीन शक्तीतूनच केली जाणार आहे. असे विचार प्रा. रा. ग. जाधव[२] यांनी मांडले आहेत ते चिंतनीय आहेत.

दलित साहित्य हा या वर्गाचा हुंकार आहे. त्यांच्या प्रेरणा दुहेरी आहेत. बाबासाहेबांची शिकवण ही त्यापैकी एक प्रेरणा असून दुसरी प्रेरणा मार्क्सची आहे. असे विचार मार्क्सवादी विचारवंतानी अनेक ठिकाणी मांडले आहेत. वास्तविक दलित साहित्याला मार्क्सची प्रेरणा मिळू शकत नाही अशी भारतीय समाज व्यवस्थेची रचना आहे. कार्लमार्क्स दलित साहित्याला आणि दलित साहित्यिकांना प्रेरणा देऊ शकत नाही. याचे महत्वाचे कारण मार्क्सचे तत्वज्ञान ! त्याचे सिध्दांत हे वर्गीय पध्दतीच्या समाज रचनेस लागू पडणारे आहेत. हिंदुस्थान सारख्या जातीय पध्दतीच्या समाज रचनेस ते लागू पडणे अवघड आहे. दलित साहित्याची प्रेरणा मार्क्सची नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जीवनगाथा, त्याचे कार्य आणि त्यांनी आपल्या वाणीतून व ग्रंथातून दिलेले अमोल विचार हीच दलित साहित्याची व दलित लेखकांची खरी प्रेरणा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यता नाकारण्याचा लढा सुरू झाला. या दलितांच्या मुक्तिसंग्रामात दलित साहित्याचा जन्म झाला आहे ही गोष्ट वादातीत आहे. डॉ. बाबासाहेबांनी " मनुष्यत्वाची प्रतिष्ठा " स्वीकारली होती, हे एक महान मूल्य आहे. महात्मा जोतिबा

UNIVERSITY ... PUR

फुल्यांनी मानवत्वाची प्रतिष्ठा मानणारा खरा सत्यधर्म सांगितला तर आगरकरांनी " मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन " करणारा विचार रूजविला . डॉ.बाबासाहेबांच्या विचारांमागे फुले,आगरकर,राजर्षी शाहू यांच्या विचारांची परंपरा आहे.

जीवनवादी दलित वाङ्मय

दलित साहित्यिकांची वाङ्मय निर्मिती मागील भूमिका केवळ कलावंताची केव्हाही नसते. त्यांची भूमिका एका जीवनदृष्टीने भारले गेल्यामुळे एका जीवन ध्येयाचा अंगिकार केल्यामुळे आणि सामाजिक वर्तनाला प्रवृत्त झाल्यामुळे मिशनरीवृत्तीच्या समाज कार्यकर्त्याची असते. त्यामुळे दलित साहित्यातील क्रांतीचे स्वरूप केवळ वाङ्मयीन क्रांतीचे नसून सामाजिक क्रांतीचे आहे.

दलित साहित्य ख-या अर्थाने जीवनवादी आहे. दलित साहित्याचा प्रवाह,त्यातील प्रेरणा,जाणीवा आणि आशय हा मध्यमवर्गीय जीवनवादी साहित्यापेक्षा वेगळाच आहे. डॉ.आंबेडकरी प्रेरणेत " माणूस" हाच केन्द्र बिंदू मानलेला आहे. माणसाची दास्यमुक्ती आणि माणसाचा सर्वांगीण विकास हाच त्याचा मूलभूत पाया आहे . म्हणून दलित साहित्याने " माणसाला केन्द्रबिंदू " मानले आहे. ही सामाजिक जाणीव त्याच्या मुळाशी आहे.

मर्यादित अनुभवविश्वात वावरणा-या मराठी साहित्याच्या कक्षा दलित साहित्याने समर्थपणे रूंदावल्या आहेत. गावकुसाबाहेर राहणा-या आणि शतकानुशतके पददलित ठेवल्या गेलेल्या एका प्रचंड समाजाच्या दु:ख, दैन्य, वेदना,उद्वेग,क्रोध, कारूण्य इ.नी युक्त असलेल्या जीवनानुभवांचा जिवंत

प्रवाह मराठी साहित्यात आणण्याचे महनीय कार्य दलित साहित्याने केले आहे. स्वत:च्या जीवनानुभवांचा प्रामाणिकपणे आविष्कार करणे, या अर्थाने जीवननिष्ठ असलेल्या श्रेष्ठ दलित साहित्यकृतीचे हे वाङ्मयीन कर्तृत्व ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे आहे. दलित साहित्याचा एकंदर मराठी साहित्यावर दूरगामी परिणाम घडून आल्या खेरीज राहणार नाही असे सांगून गं.बा.सरदार म्हणतात की, [३] " या दलित लेखकामध्ये वाङ्मयीन दृष्टी, त्या बरोबरच त्यांच्या ठिकाणी सामाजिक बांधिलकीही आहे " दलित साहित्याच्या जीवनवादी भूमिकेची सरदारांचे हे विधान म्हणजे पावती आहे.

दलित साहित्य जीवननिष्ठ आहे. दलितांच्या,पददलित आणि अन्यायग्रस्त जीवनाचे दर्शन घडविणारे दलित साहित्य हे बंडखोर आहे,पण ही बंडखोरी दलितांच्या विदारक अनुभवामुळे जाणवणारी असते. नवा सांस्कृतिक आविष्कार व नवा जीवन संस्कार करणे ही दलित साहित्याची वैशिष्टये होत. माणसाच्या न्यायाच्या व हक्काच्या मूल्यांना कलाकृतीतून आविष्कृत करणे हाच दलित साहित्याचा हेतू, हीच जीवननिष्ठा होय.

हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्याने,वर्णाश्रमधर्माने,उच्चनीच अशा स्वरुपाच्या जातिव्यवस्थेने,परंपरागतरीने दलित माणसाला दास्यात, अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत डांबले,बंदिस्त केले होते.गुलामगिरीतील या जिण्यामुळे दलितांना अपमानाचे,अवहेलनेचे जिणे जगावे लागत होते. म्हणून दलितांना या दास्याच्या, अस्पृश्यतेच्या जीवनाबद्दल चीड,संताप निर्माण झाली. ही गुलामगिरीनिर्माण करणारी शतकानुशतकांची वर्णाश्रम व्यवस्था,जातिव्यवस्था, आणि प्रस्थापित परंपरा यांचा दलित साहित्याने निषेध केला,त्याला नकार दर्शविला आणि त्याच प्रेरणेतून दलित साहित्याने माणसाच्या मुक्तीसाठी विद्रोही बंडाचा आवाज उठवला. दलित जाणिवेतून निर्माण झालेल्या दलित साहित्यकृती सत्यार्थाने वास्तववादी व जीवनवादी आहेत.

दलित साहित्यात सामाजिक जाणीव, दलित जाणीव आहे. त्यात दलित दास्यमुक्तीचा आंबेडकरी दृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनातून निर्माण झालेले वास्तव जीवनदर्शन दलित साहित्यातील कथा,काव्य,कादंबरीतून दिसते.

अर्थात दलित साहित्य आशावादी आहे. त्याला आकांक्षाही आहेत. नवा माणूस घडवावयाचा आहे,त्याला मानवतावादी ,विज्ञानवादी, बुध्दिनिष्ठ, दृष्टिकोनातून समता,बंधुता,स्वातंत्र्य व न्याय या नवीन मूल्यांवर आधारलेला नवा समाज निर्माण करावयाचा आहे. दलित साहित्यिकांच्या कलाकृतीतून हीच आशा-आकांक्षा प्रकट झालेली दिसते. आण्णाभाऊ साठे जीवनवादी वाङ्मयातील आकांक्षेची स्वप्ने पाहताना म्हणतात,[४] " जो कलावंत जनतेची कदर करतो, त्याचीच कदर जनता करते हे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर,जनतेवर नितिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी,समृध्द नि सभ्य व्हावा,इथे समानता नांदावी, या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्ने पडत असतात. ती मंगलस्वप्ने पाहात मी लिहीत असतो. केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील साम्य दिसत नसते. ते साम्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्यांना सर्वच दिसतं,परंतु ते सर्व साहित्यिकांना हात देत नाही. उलट दगा मात्र देतं.माझा असा दावा आहे की, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्या दलितांच जीवन तितक्याच प्रामाणिक हेतूनं नि निष्ठेनं मी चित्रित करणार आहे " असा यात प्रखर आशावादी,जीवनवादी दृष्टिकोन दिसतो. दलित साहित्यात जीवनवादी क्रांतीकारी सामाजिक जाणिवा आहेत,त्याला आंबेडकरी तत्वज्ञानाची बैठक आहे.

दलित लेखकाची कलाकृती ही व्यक्तीची असली तरी ती शेवटी व्यक्ति समूहाची,समाजाची बनते.दलित कलाकृतीत आविष्कृत झालेले जीवन -

दर्शन त्या समाजाचे, त्या व्यक्तिसमूहाचेच होते. ते व्यक्तिनिष्ठ राहात नाही. दलित व्यक्ती जे दु:ख भोगते ते दु:ख त्या समाजाचे दु:ख असते. व्यक्तीच्या बाह्य व अंतरमनात ज्या जखमा होतात, त्या समाजाच्या असतात. त्यात व्यक्ती ही समाजात विलीन होऊन समाजरूप घेते. व्यक्ती ही व्यक्ती रहात नाही ती समाज बनते.त्यामुळे त्या व्यक्तीचे सुख-दु:ख हे त्या समाजाचे सुख-दु:ख असते. असे हे वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यांच्या दास्यातून निर्माण झालेले दु:ख, समस्या या सामाजिक आशयाच्या असतात.त्यामुळे दलित लेखकाची वाङ्.मयीन कलाकृती ही वास्तववादी,समाजसन्मुख, समाजाभिमुख असते.

दलित साहित्य सामाजिक जाणिवेतून जीवनवादी झालेले आहे. म्हणूनच डॉ.म.ना.वानखेडे म्हणतात त्याप्रमाणे समाज व दलित वाङ्.मय यांचा फारच जवळचा संबंध आहे. हे कोणीही नाकबूल करणार नाही.म्हणून " कलेसाठी कला हा घोष जगातील सर्व समाजात फार मोठी स्थित्यंतरे झपाट्याने होत असताना निरर्थक वाटतो."

## दलित साहित्य : कलात्मक दस्तऐवज

दलितांची सांस्कृतिक चळवळ, दलित मुक्ति आंदोलन हे स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजापुढील एक मूलगामी आव्हान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळीला दलितांची, दलितासाठी आणि दलितांनी चालविलेली चळवळ असे पृथगात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढाऊ नेतृत्वाने या आंदोलनाला वैचारिक आणि कृतिपर असे अधिष्ठान प्राप्त झाले आहे. गांधीवाद,मार्क्सवाद, समाजवाद यांच्या पठडीतून दलित आंदोलन हळूहळू बाहेर पडले आहे आणि आंबेडकरवादाचे तत्वज्ञान त्याने आत्मसात करण्यास प्रारंभ केला आहे. दलितांच्या या सांस्कृतिक

चळवळीलाच स्वातंत्र्योत्तर काळात साहित्यिक चळवळीचे नवे रूप प्राप्त झाले आहे.

दलित आत्माविष्काराला विमुक्तपणे वाव मिळेल असे एकमेव क्षेत्र दलितांना आता उपलब्ध झाले आहे आणि ते म्हणजे दलित साहित्याचे क्षेत्र होय. " दलितांच्या भूतभविष्याची नि मूलभूत हक्काची ही साहित्यरूपी सनद आहे, हा स्वतंत्र भारतातील अत्यंत मौलिक असा ऐतिहासिक दस्तऐवज आहे " असा त्याचा उल्लेख प्रा.रा.ग.जाधव करतात[५] तर डॉ. हेमन्त वि. इनामदार यांनी म्हटले आहे,[६] हे दलित साहित्य म्हणजे दलित जीवनाचा कलात्मक दस्तऐवज आहे. दलित कविता ही या साहित्याची गंगोत्री आहे. " युगानुयुगे मूक राहिलेल्या अथवा मूक राहायला भाग पाडलेल्या एका समूहाला आता शब्द मिळाले आहेत. आपल्या स्वत:च्या मालकीचे साहित्य आपण निर्माण केले पाहिजे ही इच्छा त्याना झाली आहे, हीच नव्या अनुभूतीची खूण आहे.

## दोन पर्वे

या पार्श्वभूमीवर १९६० नंतर दलित साहित्याची एक पृथगात्म अशी जाणीव निर्माण झाली आहे. स्वतंत्र असे साहित्य असावे असे भान दलितांना आले आहे. ---- दलित साहित्याच्या या आद्यपर्वात दलित साहित्याची निर्मिती ही अल्पप्रमाणात होती. त्यामुळे दलित साहित्य विषयक तात्विक चर्चा बरीचशी होत राहिली. आद्यपर्वातील या तात्विक चर्चेचा आधार प्रभाव घेऊनच १९७० नंतर दलित साहित्य विविध अंगानी बहरून आलेले दिसते. साहित्य विचाराने साहित्य निर्मिती डोळस झाल्याचे अपूर्व दृश्य दलित साहित्याच्या बाबतीत या प्रकारे दिसून येते. शेंकडो दलित कवी,कथालेखक, कादंबरीकार, समीक्षक, नाटककार यांना आद्यपर्वातील वाङ्मयीन-सांस्कृतिक विचार मंथनाचा फार मोठा लाभ झाला. अनेक दलित

नियतकालिके उदयास आली आणि मराठी साहित्याच्या मुख्य-धारेत दलित साहित्याची दखल घ्यावी अशी परिस्थिती निर्माण झाली.

मराठीतील दलित साहित्य पहिल्या पर्वातून बाहेर पडून आता या दुसऱ्या पर्वात प्रवेशले आहे. साठीच्या दशकात दलित साहित्याला प्रश्नोपप्रश्नांशी झगडावे लागले ते प्रश्नोपप्रश्न आता काहीसे मागे पडले आहेत. दलित कोण ?, दलित साहित्य म्हणजे काय ?, ते कोण निर्माण करते ?, कोणासाठी निर्माण करते ?, त्याचे नेमकेवेगळेपण कशात आहे ?, त्याची व्यवच्छेदकता योग्य आहे काय ?, ती तशी मानणे रास्त आहे काय ? इत्यादी प्रश्नांचा आद्य अवस्थेतील गुंता सोडवून दलित साहित्याने पुढे यशस्वीपणे कूच केले आहे. दलित सामाजिक आंदोलनाचा आपल्या साहित्य निर्मितीशी संबंध आहे, पर्यायाने व्यापक मानवतावादी चळवळीशी आपल्या साहित्याचे नाते आहे. याचे सुजाण भान दलित साहित्यिकांना आहे. थोडक्यात दलित साहित्यामागील स्वतंत्र असा विचार गाभा सिध्द झालेला आहे व त्यातून प्रत्यक्ष साहित्य निर्मितीची प्रेरणा व दिशा लेखकांना लाभत आहे.

या दुसऱ्यापर्वात दुसरेच प्रश्नोपप्रश्न निर्माण झाले आहेत. दलित साहित्याचे साहित्यपण नेमके कशात आहे, त्याचे साहित्य म्हणून गुणदोष कोणते, त्याचे सामर्थ्य कशात आहे, त्याचा आस्वाद कसा घ्यावयाचा, त्याचे मूल्यमापन कसे करावयाचे इ. प्रश्नोपप्रश्न या दुसऱ्या पर्वात दलित साहित्याच्या संदर्भात उभे आहेत. दलित वाङ्मयीन अभिरूची निर्माण करून हे प्रश्न तिच्या आधारे सोडविणे भाग आहे. दलित साहित्य विचार सुसूत्र करणे हे या दुसऱ्या पर्वातील मुख्य उद्दिष्ट आहे. गांभीर्याने, अभ्यासपूर्वक व निकोप जिज्ञासेने ह्या समस्येला सामोरे जाणे आवश्यक आहे. यासाठी आद्य महत्वाची गोष्ट म्हणजे उपलब्ध असणाऱ्या सर्व प्रकारच्या दलित साहित्याचा

काटेकोरपणे सर्वांगीण अभ्यास करणे ही होय. हा अभ्यास साहित्य गुणांची दाद घेणारी रसिकता आणि सांस्कृतिक अंगाचे भान ठेवणारी प्रज्ञा या दोन्ही दृष्टींनी करणे इष्ट आहे.

दलित साहित्य : वाङ्मय प्रकार

दलित साहित्याची प्रत्यक्षात निर्मिती कमी आहे. आणि दलित साहित्यावर चर्चामात्र अधिक ही आजची वस्तुस्थिती आहे. त्यातही प्रामुख्याने कथा आणि काव्य हे वाङ्मयप्रकारच दलित साहित्यिकांनी हाताळलेले दिसतात. अन्य वाङ्मय प्रकारांकडे हे साहित्यिक वळलेले दिसत नाहीत. अर्थात शेकडोवर्षे वाचाबंद राहिलेल्या आणि नुकतेच कुठे लेखन करू लागलेल्या दलित साहित्यिकांनी एकदमच सगळे वाङ्मयप्रकार हाताळावेत ही अपेक्षा योग्य ठरणारी नाही.

कादंबरी -- दलित साहित्यात कादंबरी लेखनाचा अभाव आहे. दलित लेखकांना कादंबरीकडे फारसे वळावेसे वाटलेले नाही. कांही कादंबऱ्या लिहिल्या असल्या तरी दलितत्व आणि साहित्यत्व या दोन्ही दृष्टींनी त्या फारशा विचारात घेण्यासारख्या नाहीत. त्या रंजनपर, स्वप्नाळू, चटकदार अशा मराठी कादंबरीच्या वळणाच्याच आहेत. उदा. " फकिरा", (अण्णाभाऊ साठे ), अलगुज, चित्रा, चंदन, रानगंगा, माकडीचा माळ, आघात( सर्व अणाभाऊ साठे), हातभट्टी, "मी मुक्त ! मी मुक्त !", " गावचा टिनोपाल गुरूजी ", " "मसालेदार गेस्ट हाऊस " (सर्व शंकरराव खरात ) हकीकत व जटायु ( प्रा. केशव मेश्राम ), काजळी रात्र, तांबडा दगड, विलासिनी ( श्री.ना.रा.शेंडे ) आणि डॉ.अंजना ( श्री.ना.ब.जाधव ) इ. कादंबऱ्यांची घाटणी रंजनपर, स्वप्नाळू, चटकदार अशा मराठी कादंबरीच्या

वळणाचीच आहे. दलित जीवनाचा शतकाचा प्रवास हा एखादा महाकादंबरीचा विषय होऊ शकणारा आहे. प्रत्येक दलित व्यक्तीचे जीवन हाही एखाद्या कादंबरीला पुरेसा असा समर्थ विषय होऊ शकेल. असे असतांनाही श्रेष्ठ दलित कादंबरी निर्माण होऊ शकलेली नाही हे सत्य आहे. दलितांची कादंबरी फारशी विचार करण्यासारखी नाही. सूड (बाबुराव बागूल), हकीकत व जटायू (केशव मेश्राम), फकिरा (अण्णाभाऊ साठे) इ. थोडे अपवाद वगळले तर दलित लेखकांचे लेखनादर्श फडके - खांडेकर प्रणीत कादंबरीचेच आहेत. आजच्या घडीला बाबुराव बागूल यांच्या मध्येच असे कादंबरी निर्माण करण्याचे सामर्थ्य जाणवते.

<u>नाट्य । एकांकिका</u> -- पारंपारिक लोककलामध्ये दलित समाजाचा सहभाग मोठया प्रमाणात असे. विशेषत: तमाशासारख्या मुक्त व प्रभावी लोककलांच्या उभारणीत दलित कलावंत मोठया प्रमाणात सहभागी होतात.तमाशाची परंपरा जतन करण्यात दलित कलावंताचा मोठा वाटा असून आजही त्या लोककलेचे उरले सुरले अवशेष त्यांनीच सांभाळून ठेवलेले दिसतात.तमाशा सारख्या मुक्त, समर्थ रंगभूमीची परंपरा असताना दलित साहित्यात नाटय लेखनाचा अभाव दिसतो. कादंबरी प्रमाणेच नाटयलेखनही दलित लेखक फारसे करताना दिसत नाहीत. याबाबत काही तुरळक प्रयत्न झालेले आहेत आणि होत आहेत. दलित प्रतिभेने नाटय-लेखनाकडे अवश्य वळावे, कारण दलित जाणिवेला जे व्यक्त करावयाचे आहे व त्यातून जो परिणाम साधावयाचा आहे, त्यासाठी नाटयकलेइतके दुसरे प्रभावी माध्यम नाही. जो विद्रोह, जो नकार त्यांच्या मनात आहे तो जनात रुजविल्याशिवाय समाजपरिवर्तन घडून येणार नाही.सांस्कृतिक बदल घडून येणार नाही.त्यांना लोक म्हणतील की प्रचारकी नाटक टिकणार नाही. टिकण्यासाठी नंतर नाटक लिहावे पण आता विचार रुजवणारे नाटकच त्यानी लिहायला हवे.मन:पूर्वकता व निष्ठा या जोरावरच दलित लेखकाला

रंगभूमीचे माध्यम सामर्थ्याने वापरता येईल. मराठी नाटयाने निर्माण केलेल्या कोंडीतून दलित नाटयाला आपला स्वतंत्र मार्ग काढावा लागेल. यासाठी दलितांची स्वतंत्र रंगभूमीच निर्माण झाली पाहिजे. डॉ.गणवीर म्हणतात त्याप्रमाणे " दलित थेटर " ची कल्पना साकार झाली पाहिजे. -- अन्य कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा नाटक हा अधिक सामाजिक वाङ्मय प्रकार असल्याने दलित लेखकांनी त्याकडे वळणे अनेक दृष्टीनी इष्ट ठरेल. या दृष्टीने नाटयलेखनाकडे वळलेल्या लेखकामध्ये दत्ता भगत (एकटी, शोध, पराभव, आवर्त इ.) यांच्या एकांकिका लेखनाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. तसेच "मृत्युशाला" ही गंगाधर पानतावणे यांची एकांकिका उल्लेखणीय आहे. या लेखकद्वयानी दलित नाटयलेखना विषयी मोठया अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

<u>आत्मकथा</u> -- दलितांचे आत्मकथालेखन दलित साहित्यातच नव्हे तर मराठी साहित्यातील आत्मचरित्राचे दालन अधिक समृध्द करणारे ही आहे. उपलब्ध दलित साहित्यातील सर्वांत सकस आणि समर्थ अशा साहित्यकृती मध्ये अलिकडेच कांही दलित लेखकांनी लिहिलेली आत्मकथने उल्लेखनीय ठरलेली आहेत दया पवार ( बलुत ), माधव कोंडविलकर ( "मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे ), प्र.ई.सोनकांबळे (आठवणीचे पक्षी ) या तिघांच्या आत्मकथनांचा याबाबतीत अवश्य उल्लेख करावा लागतो. या विशिष्ट व्यक्तींच्या आत्मकथातर आहेतच पण त्या त्या विशिष्ट समाजाच्या ही कथा झालेल्या आहेत. त्या व्यक्ती बरोबर एक प्रचंड समाजही त्या आत्मकथातून प्रत्ययकारीपणे प्रकट झाला आहे. आघातांनी शहाण्या झालेल्या विस्तारत राहणाऱ्या प्रश्नांनी प्रगल्भ केलेल्या, असंस्कृतपणाचा पदोपदी अनुभव घेत सुसंस्कृत झालेल्या संवेदनाशील मनांची अथपासून इतिपर्यन्तची कुचंबणा म्हणजेच या आत्मकथा होत. अशा सर्वगामी दुःखाचे चित्रण मराठी आत्मकथनात्मक साहित्यात खरोखरच अपूर्व आहे !

<u>नियतकालिके</u> --

दलित साहित्याच्या चळवळीत दलित वाङ्.मयीन नियतकालिकांचा वाटा मोठा आहे. दलित वाङ्.मयीन प्रवृत्ती प्रकाशात आणणे, प्रतिष्ठित करणे, जुन्यांचा पुनर्विचार करणे ही वाङ्.मयीन कामगिरी दलित वाङ्.मयीन नियतकालिकांनीच केली आहे. दलित साहित्यिकांनी लिहिलेले साहित्य " जनता ","प्रबुद्ध भारत " या नियतकालिका मधून व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने प्रसिध्द होणा-या वार्षिकातून प्रसिध्द होत असे पण आता दलित साहित्याच्या चळवळीला वाहिलेली नियतकालिके हे कार्य करीत आहेत. " विद्रोह" (अनियतकालिक),"आम्ही ", (मासिक), "निकाय " (व्दैमासिक),"अस्तित्व","प्रमेय","दलित क्रांति", ( सर्व त्रैमासिके )," जातक","संसद","समाज","अस्मितादर्श (सर्व व्दैमासिकें) इत्यादी उल्लेखनीय दलित वाङ्.मयीन नियतकालिके आहेत.

जागृत दलित मनांची स्पंदने या नियतकालिकांतून उमटलेली दिसून येतात. दलित प्रतिभेचे पहिले वहिले अंकुरही याच नियतकालिकातून विकसले आहेत. उमटलले आहेत. आज आघाडीवर असणा-या अनेक दलित साहित्यिकांचे पहिले वहिले लेखन याच नियतकालिकातून प्रसिध्द झाले आहे. दलित साहित्याला एक जोमदार प्रवाहाचे रूप प्राप्त करून देण्याचे कार्य नियतकालिकांनी केले आहे.

<u>कथा</u> -- दलित साहित्यात दलित कथेला,कवितेे इतके नसले तरी लक्षणीय स्थान मिळाले आहे. संख्यात्मक दृष्टीनेही ही विचार केल्यास दलित साहित्यात कवितेच्या खालोखाल कथेचा क्रमांक लागतो. आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात,बाबुराव बागूल यांच्या कथा लेखनाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. दलित कथा ही सामान्यत: दलित जीवन

दर्शनपर कथा आहे. या दलित कथा मधून जीवनाभिमुखता आणि वास्तवता विश्लेषणाची क्षमता दिसते. दलित कथाकार हे सामाजिक बांधिलकी मानणारे कथाकार आहेत. कथा ही वास्तवाशी पक्केपणाने बांधलेली आहे. तिला सामाजिक भान आहे. तसेच तिच्यात दलितांच्या चळवळीची स्पंदनेही आहेत.

दलित कथाकार म्हणून बाबुराव बागूल, शंकरराव खरात यांच्या बरोबरच केशवमेश्राम, अर्जुन डांगळे,योगीराज वाघमारे, वामन होवाळ इ. कथाकारांचा उल्लेख करावा लागतो. वास्तवदर्शन हा दलित कथांचा महत्वाचा विशेष आहे. दलित कथाकारांचे अनुभव अस्सल आहेत. रंजकतेचे मोह त्यांनी टाळले आहेत. वास्तवाचे त्याचे भान पक्के आहे.त्यांच्या या गुणांच्यामुळे दलित कथा लेखकास मराठी साहित्यात लक्षणीय स्थान मिळालेले आहे.

<u>कविता</u> -- आजच्या मराठी कवितेचा विचार म्हणजे मुख्यत्वे दलित कवितेचाच विचार होय. ही दलित कविता मराठी कवितेतील तिसरे प्रबोधन होऊन आलेली आहे असे यशवंत मनोहर म्हणतात[७] ते खरे आहे. आमुलाग्र नवदर्शनाचा सोहळा फुलवीत ही कविता आली आहे. केशव मेश्रामांना दलित कविता हे आजच्या दलित साहित्याचे खरेखुरे शक्तिस्थान आहे असे वाटते. दलित साहित्यात या दलित कवितेला लक्षणीय बहर आला आहे. आंबेडकरी प्रेरणा घेऊन आलेली दलित कविता प्रस्थापित मूल्याविरूध्द, परंपरेविरूध्द आपल्या उरातील संतापाची आग ओकत आहे. वर्णाश्रम,धर्माविरूध्द, अन्याय अत्याचारा विरूध्द माणसाच्या मुक्तीसाठी बंडकरून उठली आहे. दलित कविता आपल्या हृदयात उच्च आशा आकांक्षा धरून नवसमाज निर्माण करू इच्छिते, दलित कविता आपल्या जीवनाच्या काळजातून निर्माण होत आहे ती आपल्या बंदिस्त हृदयातला जळजळीत हुंकार बाहेर टाकत आहे. आजची "दलित कविता ही सामाजिक

स्वातंत्र्याचे सैनिक असलेल्या पूर्वजांच्या खांद्यावर उभी आहे " असे प्रा.गंगाधर पानतावणे म्हणतात ते त्याला खरोखरच अर्थ आहे.

परंपरेने चालत आलेल्या मराठी कवितेपेक्षा दलित कविता ही आशय दृष्ट्या वेगळी असल्याचे जाणवते. मराठी कवितेच्या अनुभवक्षेत्राचे बांध तिने घडाघड फोडून टाकले आणि उच्चवर्गीयांच्या भावभावनांभोवती घुटमळणाऱ्या कविता प्रवाहास समाजाच्या तळागाळांपर्यन्त नेऊन पोचवले. मराठी कवितेचे अनुभवविश्व दलित कवितेने अधिकाधिक व्यापक केले .शेंकडो वर्षों मुक्या राहिलेल्या अंत:करणाचे कढ दलितकवितेव्दारा प्रकट होऊ लागल्याने जाणिवांचा एक समर्थ प्रवाह मराठी कवितेत जोमाने अवतरला. दलित कवितेने आणलेल्या अस्सल,शक्तिशाली, जिवंत जाणिव्यांच्या प्रवाहाने मराठी कविता अधिकच तेजस्वी झाल्याचा निर्वाळा बाळकृष्ण कवठेकरांनी दिला आहे.

दु:ख, वेदना, विद्रोह, नकार यांच्या बरोबरच कृतज्ञता, आदर, आशावाद आणि उत्साह ही एकूणच दलित कवितेच्या आशय विश्वाची वैशिष्ट्ये आहेत. दलित कवितेच्या आशयाचे हे स्वरूप पाहिले की, परंपरेने चालत आलेल्या मराठी कवितेपेक्षा ती आशयदृष्ट्या वेगळी असल्याचे जाणवते.

संस्कृती,परंपरा आणि वाङ्मय याना दलित कवितेतून कडाडून नकार दिलेला आढळतो. दु:खाने तगमगणाऱ्या, संतापाने पेटून उठणाऱ्या दलित कवितेत कृतज्ञतेचे कोमल सूरही हृदयपणे उमटलेले आहेत. विशेषत: बहुतांश दलित कवींच्या आई विषयीच्या कविता या संदर्भात आवर्जून पाहण्यासारख्या आहेत. दलितांना नवी दृष्टी देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.फुले, कार्लमार्क्स यांच्या विषयी दलित कवितेने नितांत आदर व्यक्त केला आहे. भूतकाळ व वर्तमानकाळ यातील दु:ख आणि वेदना यांचा आविष्कार करणाऱ्या दलित कवितेला निराशेचा स्पर्शही झालेला नसून

3661
A

भविष्यकाळाची अत्यंत उज्ज्वल अशी स्वप्ने तिने रंगविलेली आहेत. सामाजिक समतेची, मानवमुक्तीची, विश्वबंधुत्वाची गाणी तिने उत्साहाने गायिलेली आहेत -- या सर्व विवेचनाचा सार इतकाच की, दुःख, वेदना, विद्रोह आणि नकार यांच्या बरोबरच कृतज्ञता, आदर, आशावाद आणि उत्साह ही एकूणच दलित कवितेच्या आशय विश्वाची वैशिष्ठ्ये आहेत आणि हे आशयाचे स्वरूप परंपरागत मराठी कवितेच्या आशयापेक्षा वेगळे आहे.

दलितांची कविता ही जगणाऱ्यांची कविता आहे. त्यांच्या जीवनामध्ये असलेले भीषण दुःख ते भोगत आहेत. जगत आहेत. हे जीवन जगणे खरोखरच भीषण आहे. खोट्या, कृत्रिम माणसांचा बुरखा फाडून टाकण्या - साठी ती जन्माला आलेली आहे. सुर्वे यांचे " ऐसा गा मी ब्रह्म ", " माझे विद्यापीठ", ढसाळांचा " गोलपिठा", " वामन निंबाळकरांची " गावकुसा - बाहेरची कविता" या शिवाय शशिकांत लोखंडे, राजा ढाले, अर्जुन डांगळे, नीलकांत चव्हाण, मोरेश्वर वाहणे, कोतापल्ले, अशोक बागवे, सपकाळे, प्रेमानंद बागडे, किशोर सानप अशा कितीतरी दलित कवींची नावे सांगता येतील की, त्यांची कविता ही त्यांच्या जीवनातून निर्माण झाली आहे.

दलितांची कविता ही त्यांच्या जीवनातून , जगण्यातून निर्माण झालेली आहे, म्हणून केवळ ती दलितांच्या जीवनाचे चित्रण वा वर्णन करीत नाही, तर ती त्या जळत्या आयुष्यापाठीमागे असलेली कारणे शोधते. त्यांचा अंतर्वेध घेऊ इच्छिते आणि जीवनावर ती भाष्यही करते. समाज व्यवस्था ही मानव निर्मित आहे व ती बदलण्याची शक्ती दलितांच्या जवळ येऊ लागलेली आहे, त्याची साक्ष त्यांच्या कवितेमधून लाभते.

अनुभवाच्या किंवा आशयाच्या वेगळेपणाने कविता श्रेष्ठ ठरत नसते. तर अनुभवांची सखोलता, तरलता, सूक्ष्मता, जीवन दर्शन क्षमता, सौंदर्य संपन्नता इ.मुळे कोणत्याही साहित्यकृतीचे चांगलेपण ठरत असते. दलित कविता ही

आशयदृष्टया तर वेगळी आहेच पण ती साहित्यदृष्टयाही वरील गुणांच्या उपस्थितीमुळे चांगली ठरली आहे. दलित कविता पांढरपेशी मराठी कवितेपेक्षा वेगळी असून मूलगामी स्वरूपाची आहे.

दलित कवितेचा जन्म हा या देशातील नकार आणि स्वीकाराच्या जीवनप्रेरणेतून झाला आहे. दलित कवितेचे नाते मातीशी आहे. म्हणून ती आपल्या सांस्कृतिक विशेषासह व वेगळेपणासह आपल्या कवितेतून होते. तिचा अंत:स्त्रोत्र वर्तमान मराठी कवितेपेक्षा वेगळा आहे. त्यामुळे तिचे सामर्थ्य ही लक्षणीय आहे. ती कृत्रिम नाही. पराभूत नाही. कुबड्या घेणारी नाही, तुच्छ जीवन भोगलेली पण जीवनास, तुच्छ मानणारी नाही. कृत्रिम, पराभूत किंवा कुबड्या घेणारी कविता आत्मवंचक व प्रासादिक असते. दलित कविता नव्या, परिवर्तनशील सौंदर्यकल्पनात अवगाहन करणारी आहे.

क्रांतिकारी कविता ही नेहमीच नवी असते. तिच्यातील नावीन्य तिच्या अंतरंगाचे नावीन्य असते. म्हणूनच दलित कविता आजच्या मराठी कवितेपेक्षा अधिक सकस व अधिक संपन्न आहे.

तात्पर्यार्थ इतकाच की, दलित साहित्याची क्षितिजे आज विस्तारत आहेत. केवळ कविताच नव्हे तर आत्मचरित्र, कादंबरी, कथा, आठवणी, नाटक या रूपानेही ते वाढत आहे. या सर्वांमध्ये अधिक विस्तार झाला आहे तो कवितेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या वर्गाच्या मुक्ती लढ्याला तीव्र स्वरूप दिले त्या प्रेरणेतून ही सारी कविता जन्माला आली. हे सर्व पाहिले की दलित साहित्याचा प्रवाह नगण्य आहे असे माधव मनोहरांनी म्हंटले तरी बिघडले कुठे ?

## दलित साहित्यिकांची साहित्य विषयक भूमिका

दलित साहित्याचे केले गेलेले मूल्यमापन पाहताना स्पष्ट जाणवते की, " दलितत्व " ही गोष्टच अधिक करून लक्षात घेऊन समीक्षा लेखन झाले आहे. बाळकृष्ण कवठेकर म्हणतात त्या प्रमाणे " दलितत्व हा जसा तुच्छतेचा, तिरस्काराचा किंवा सहानुभूतीचा आणि दयेचा विषय होऊ शकत नाही, तसाच दलितत्व हा भांडवलाचाही विषय होऊ शकत नाही " तेव्हा " दलितत्वाचे " भांडवल करून झालेले समीक्षालेखन फारसे उपयुक्त वा हितकारक नाही. समीक्षकांची ही भूमिका सर्वस्वी घातक आणि त्याज्य आहे. तरी दलितांच्या अनुभवांशी सहसंवेदना ठेवून निःपक्षपाती वाङ्मय दृष्टीने केलेली समीक्षाच दलित साहित्याला पोषक ठरू शकेल.

दलित साहित्याच्या संबंधात जेव्हा जेव्हा त्या साहित्याच्या वेगळेपणाचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा पांढरपेशी टीकाकार,"साहित्य तेवढे एक. साहित्यात वेगवेगळेपणा नसतो " असे सांगतात आणि दलित साहित्याचे मूल्यमापन वाङ्मयीन कसोट्यांवरच केले जावे अशी आग्रही भूमिका स्वीकारतात. पण या समीक्षकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, दलित साहित्याच्या आत्म्याशी एकरूप होऊन,त्याचा आत्मा जाणूनच त्याचे समीक्षण करावे लागेल. अगोदरच ठरवलेल्या,बनवलेल्या वाङ्मयीन कसोट्यांच्या साच्यात,मापात बसवून दलित साहित्याचे मूल्यमापन करता येणार नाही.

मराठी समीक्षा, प्रवृत्ती व पध्दतीचे स्वरूप पाहूनच प्रा.केशव मेश्राम म्हणतात की,[10] " दलित साहित्याची समीक्षा करण्याची ताकद, मराठी समीक्षकांनी दाखविली नाही.सौंदर्याचे जेथे व्याकरण केले जाते .... तेथे दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी मराठी समीक्षा अपुरी आहे.

मराठी वाङ्मयातील साहित्य समीक्षा,वाङ्मय मूल्यमापनाच्या

कसोटया पाश्चात्य वाङ्मयातून घेतलेल्या आहेत. या बाबत सुधीर रसाळ लिहितात[११] " इंग्रजीच्या आगमना बरोबर आम्ही घाईघाईने आमच्या वाङ्मयीन परंपरेचा त्याग करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी वाङ्मयीन परंपरेच्या संपर्काने आम्ही आमच्या परंपरेला नवा अर्थ देण्याचा प्रयत्न केला नाही. स्वत:ची परंपरा जशी पूर्णपणे कधी टाकता येत नाही,तसेच दुसऱ्यांची परंपराही कधी पूर्णपणे स्वीकारता येत नाही.पाश्चात्य परंपरा स्वीकारण्याच्या घाईने दोन परंपरांचे सम्मीलन करण्याचे राहून गेले...." ही नवी समीक्षा मूल्ये महाराष्ट्रातील आजच्या समाजजीवनापासून दूर असून दलित जीवन, जाणीवा, दलित साहित्यापासून अति दूर आहेत. म्हणून मराठी पांढरपेशी समीक्षा येथे थिटी पडते तिच्या फूटपट्यांच्या मापात दलित साहित्य बसूच शकत नाही. या मराठी समीक्षेबद्दल प्रा.म.भि. चिटणीस म्हणतात,[१२] " मराठी समीक्षा हे मराठी साहित्यावर वाढलेले बांडगुळ आहे. येथील समीक्षा येथील जमिनीतून स्फुरली नाही, ती बाह्य - संदर्भी,बाह्यमूल्य आहे." दलित साहित्य हे जीवनवेधी आहे. वाङ्मय हा मानवी जीवनावर वाढलेला बांडगुळासारखा विस्तार नाही.पांढरपेशी समीक्षा मूल्ये ही उपरी,कृत्रिम चौकट आहे. त्यात दलित साहित्य बसू शकत नाही.

वाङ्मयीन कलाकृती या काळाबरोबर बदलत असतात. आणि वाङ्मयीन कलाकृतीच्या बदलाबरोबर समीक्षेचे मानदंड-कसोटयाही बदलतात. वाङ्मयीन कसोटया ,मूल्ये सदा सर्वकाळ स्थिर स्वरूपात नसतात तर -- कालखंडातील वाङ्मयीन बदलाबरोबर ती बदलत असतात. प्रा.कुसुमावती देशपांडे यांनी समीक्षा हा विकसनशील साहित्य प्रकार मानला असून ही समीक्षा तत्वे सामाजिक वातावरणामुळे आणि विचारप्रणालीमुळे निर्माण होत असतात असे म्हटले आहे. प्रा.शरदच्चंद्र मुक्तिबोध यांचे विचार असेच आहेत.

पण समीक्षेचे बदलते रूप लक्षात न घेताच जे समीक्षक दलित साहित्याची समीक्षा करू जातात ते आपल्या अज्ञानामुळेच " दलित साहित्य उथळ आहे," दलित साहित्य प्राथमिक अवस्थेतील आहे, ते साहित्य या पदवीला पोचत नाही " इ. अभिप्राय व्यक्त करताना दिसतात. दलित साहित्याच्या भूमिकेचे यथातथ्य आकलन झाल्याशिवाय त्याच्याबद्दल उथळ मतप्रदर्शन होणे उचित नाही.

दलित साहित्याचे मूल्यमापन करताना या बदलत्या कसोटयांच्या साह्याने त्याचे मूल्यमापन करावयाचे की परंपरावादी वाङ्मयीन कसोटयांचाच आग्रह धरून मूल्यमापन करावयाचे हाच खरा प्रश्न आहे. प्रा. विद्याधर पुंडलिक परंपरावादी वाङ्मयीन कसोटयांचाच आग्रह धरताना दिसतात,[१३] " दलित साहित्य हे दलित म्हणून वेगळे निकष मागू शकत नाही.त्याचे मूल्यमापन कलेच्या स्वयंभू आणि स्वतंत्र कसोटयावरच पारखावे लागेल " असे ते म्हणतात. श्री.बाळकृष्ण कवठेकर म्हणतात की,[१४] " दलित साहित्याने पारंपरिक आणि प्रचलित मूल्यांना दिलेला नकार अनिष्ट ठरणार आहे. नकार देऊन मूल्ये नाहीशी होत नाहीत, आपण मात्र मूल्यचिकित्सेला पारखे होतो " दलित साहित्याचे मूल्यमापन पारंपरिक रूढ कसोटयांच्या आधारेच व्हावे असेच विचार मांडणारे प्रा.पु.शि.रेगे हे एक टीकाकार आहेत. त्यांच्यामते वास्तवतेला महत्व नाही.वाङ्मयीन कलाकृतीचे मूल्यमापन कलेच्याच कसोटीवरच झाले पाहिजे -- "कलेसाठी कला " या मताचा पुरस्कार करीत आणि जीवनवादी दलित साहित्याला उथळ,प्राथमिक अवस्थेतील साहित्य असे हीनवत झालेल्या सर्वच समीक्षेचा येथे आढावा घेण्याची गरज नाही. पण त्याची ही समीक्षा -- अद्यापी निराग्रही,मुक्तदृष्टीने,प्रांजळपणे झालेली समीक्षा नव्हे, हे मात्र नोंदले पाहिजे. साहित्याकडे आकृतिवादी (Formalist) भूमिकेतून पाहून केलेले हे मूल्यमापन आहे.

दलित साहित्याचे समीक्षण करताना या साहित्याकडे आकृतिवादी ( Formalist ) भूमिकेतून पाहून चालणार नाही. डॉ.वानखेडे म्हणतात त्याप्रमाणे जीवनाचा आणि कलाकृतीचा काही संबंध नाही असे प्रतिपादन करणाऱ्या आकृतिवादी भूमिका घेणाऱ्या टीकाकाराला दलित साहित्याचे मूल्यमापन करताना आपली भूमिका बदलावी लागेल. दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदनेचे,नकाराचे,विद्रोहाचे रूप सर्व बाजूनी नीट समजावून घेतल्याशिवाय " ते कलात्मक कसोट्यांना उतरत नाही " असा निर्णय देणे त्या साहित्यावर अन्याय करणारे ठरेल.

दलित लेखकांनी सामाजिक जाणिवेतून केलेले लेखन हे लेखनच नव्हे असा सौंदर्यवादी समीक्षकांचा पुकारा चुकीचा आहे. डॉ. वानखेडे यानी तर पांढरपेशा लेखकांनी आणि समीक्षकांनी ठरविलेली मूल्ये, सिध्दांत,कार्य आणि सौंदर्याची सापेक्षी मूल्ये दलित लेखकांनी झुगारून दिली पाहिजेत असे म्हंटले आहे आणि मराठी समीक्षकांच्या दृष्टिकोनावर त्यांच्या मनोभूमिकेवर आपल्या या भूमिकेतून स्वच्छ प्रकाश टाकला आहे. पांढरपेशी मराठी वाङ्मयीन टीकामूल्ये व वाङ्मय याबद्दल ते स्पष्टपणेच म्हणतात,[१५] " समाज ढवळून निघत आहे. आपल्या आतापर्यन्तच्या स्थिर सिंहासनाला भूकंपाचे धक्के बसत असल्याची जाणीव झाल्यामुळे पांढरपेशी लेखक व समीक्षक " कलेसाठी कला " हा मंत्र अधिकच जोराने बडबडू लागला आहे. दलित लेखकांनी या सुंदर दिसणाऱ्या " सायनरच्या " आवाजाला भुलू नये. कला समाजासाठी नाही तर कुणासाठी आहे ? "

दलित साहित्याचे मूल्यांकन करताना त्याचे समाज सापेक्ष स्वरूप समजून घ्यावे लागेल. आकृतीवादी समीक्षा पध्दतीचा स्वीकार करता येणार नाही. आज व्यक्तीपेक्षा समाज महत्वाचा आहे. या समाजाचे मन दलित साहित्यातून जाणवत आहे." साहित्य " हे व्यक्तिनिष्ठ आहे, असे आजपर्यन्त

पांढरपेशी समीक्षकांची भूमिका व दृष्टिकोन आहे. पण जेव्हा दलित लेखक हा साहित्याच्या क्षेत्रात आला, तेव्हा तो त्याबरोबर आपला दलित समाज दलित व्यक्तीत्वाच्या रूपाने घेऊन आला. म्हणून दलित लेखकांची साहित्यकृती ही त्याचे व्यक्तीचे असून, त्याच्या समाज समूहाचीच ती कलाकृती असते. अशा वेगळ्या दृष्टीच्या वेगळ्या अभिव्यक्तीच्या दलित साहित्याला प्रस्थापित पांढरपेशी समीक्षामूल्ये कशी लागू करता येतील ? ही मूल्येच दलित साहित्याला मान्य नाहीत. डॉ.प्रभाकर मांडे म्हणतात,[१६] "दलित व्यक्ती वाड्.मय हे व्यक्तिनिष्ठ राहत नसून दलित समूहाचेच वाड्.मय असते, ते समष्टीचे वाड्.मय बनते. त्याच्या या स्वरूपामुळे प्रचलित वाड्.मय विचाराच्या आधारे त्याचे मूल्यमापन करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, तेव्हा त्याला प्रत्यक्ष सामोरे जाऊन त्याचे निराळेपण न्याहाळले पाहिजे. काही नव्या निकषांच्या आधारे त्याची प्रतवारी करावी लागेल " प्रा.गंगाधर पानतावणे यांनीही,[१७] " दलित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नाही, त्यास समष्टीचे रूपही लाभते. दलित साहित्याच्या संदर्भात पारंपरिक कसोटयांचा पूर्ण विचार होणे आवश्यक बाब आहे. केवळ आकृतिबंधाचा विचार करून दलित साहित्याला निकृष्ट ठरविण्यात अर्थ नाही. दलित साहित्याला रूढ समीक्षा मान्य नाही " असाच विचार मांडला आहे.

वास्तवता व कलात्मकता हा दलित साहित्याचा आत्मा आहे. जीवनातील वास्तव अनुभवाशी प्रामाणिक राहूनच दलित लेखक हा आपल्या साहित्य कलाकृतीला जन्म देतो.जीवनातील वास्तवता ही साहित्यकृतीचा " प्राण " आहे. दलित साहित्याकडे याच वास्तवतेच्या दृष्टिकोनातून पहावे लागेल. म्हणूनच प्रा.रा.ग.जाधव " दलित साहित्य " व " समीक्षक" यांच्या संदर्भात म्हणतात[१८], "मराठी समीक्षेला जीवनवादी विचार देण्याचे ऐतिहासिक कार्य दलित साहित्याचे आहे. म्हणूनच नवोदित दलित साहित्य हे मराठी समीक्षेला व विचारवंतांना असलेले एक मोठे आव्हान आहे.मराठी

समीक्षेला याबाबतीत आपली बैठक काहीशी बदलावी लागेल. सामाजिक वास्तवाचे भान राखूनच दलित साहित्याची मीमांसा करावी लागेल."

दलित साहित्याच्या समीक्षेसंबंधी प्रा.वा.ल. कुलकर्णी यांनी व्यक्त केलेले विचार महत्वाचे आहेत ते म्हणतात[१९] Formalist किंवा Contextual टीकाकारांना म्हणजे जीवनाचा आणि कलाकृतीचा काही संबंध नाही असे प्रतिपादन करणाऱ्यांस आपली भूमिका बदलावी लागेल. तर त्यांना या वाङ्मयाला सामोरे जाता येईल. " त्यांच्या दृष्टीने Formalist टीका साफ फसली आहे. ती इतकी तंत्रात्मक बनते की तिच्यातील सगळे सौंदर्य निसटून जाते. या सर्वांचे सार हेच की, दलित साहित्याचा विचार करताना त्याचा सामाजिक संदर्भ लक्षात घेतला पाहिजे.

दलित साहित्याने मराठी साहित्याची कोंडी फोडली त्याचप्रमाणे मराठी साहित्यातील रूढ समीक्षा-मूल्यांचीही कोंडी फोडली आहे. दलित साहित्याने परंपरागत प्रस्थापित साहित्यमूल्ये नाकारली तशीच समीक्षा - मूल्येही नाकारली आहेत. दलित साहित्यकृतीतूनच दलित साहित्याची समीक्षामूल्ये आपोआपच निर्माण होत आहेत. साहित्य कसोट्या,मानदंड हे बदलत्या काळाच्या ओघाबरोबरच बदलतात. हेच खरे आहे. प्रा. वा. ल. कुलकर्णी या संदर्भात म्हणतात की,साहित्य एक अखंड विकासक्षम अशी चिद्वस्तू आहे तेव्हा तिचे एकदाच नियमन व्हावे कसे ? म्हणूनच साहित्याचे, साहित्य समीक्षेचे काटेकोर शास्त्र निर्माण होऊ शकत नाही.तत्संबंधीचे मोजमाप करण्यास उपयोगी पडणारी कायमची सोयीस्कर अशी कोष्टके तयार होत नाहीत. ही कोष्टके तयार होताच हाती लागते ते साहित्य नव्हे.साहित्याचे कलेवर ! -- असाच विचार प्रा.गो.म.कुलकर्णी यांनी मांडला आहे.[२०] त्याच्या मते साहित्य त्याच्या चांगल्या-वाईटपणाचे गमकमूल्य कालप्रवाहात लवचिक, दोलायमान रूप धारण करत आले आहे.सदर

मूल्याच्या अर्थवत्तेत सतत बदल होत आहेत, आणि तसे ते पुढेही होत राहातील.

दलित साहित्याला दलितत्वाची जाणीव आहे. या समाजाचे मन दलित साहित्यातून जाणवत आहे. दलित साहित्य रसप्रतीती आणून देते की नाही हा प्रश्नच गौण आहे. ते तुमच्या मनाला उद्ध्वस्त करू पाहते आहे. त्याची प्रकृती वेगळी त्यामुळे त्याचे रूपही वेगळे ! येथे मराठी समीक्षेचे पारंपरिक मानदंड काय कामाचे ?

सामाजिक जाणिवेतून, दलितत्वाच्या जाणिवेतूनच दलित साहित्य निर्माण होत आहे. सामाजिक जाणिवा हा दलित साहित्याचा मूळ आधार आहे. त्यात " माणूस " हा केन्द्रबिंदू आहे. माणसाची दास्यातून मुक्ती हा त्याचा मूळ पाया आहे. या दृष्टीने दलित साहित्याची निर्मिती होत आहे. त्यामुळे दलित साहित्यात प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुध्द संताप,प्रक्षोभ, विद्रोह उफाळून उठतो . हा प्रक्षोभ, विद्रोह दलितांच्या दैनंदिन दु:खी जीवनातून निर्माण झाला आहे. अशा या दलित साहित्यात प्रखर अशा सामाजिक जाणीवा आहेत. तेव्हा दलित साहित्यांची ही सामाजिक जाणिवेची मूलभूत दृष्टी पाहिली असता त्याची समीक्षा करावयाची झाल्यास समीक्षकांत या दृष्टीची जाणीव आवश्यक असली पाहिजे. त्या शिवाय दलित साहित्याचे मूल्यमापन मराठी पांढरपेशी समीक्षकाला करता येणार नाही. रूढ समीक्षा पध्दतीच्या चौकटीत दलित साहित्य बसूच शकत नाही. दलित साहित्याच्या मूल्यमापनाच्या कसोट्या या रूढ समीक्षा पध्दती पेक्षा वेगळ्याच राहणार आहेत.

दलित लेखक हा आपल्या अनुभवाशी प्रामाणिक आहे, आपल्या जवळच्या विपुल अनुभवास आपल्याच मायबोलीत,मायभाषेत आविष्कृत करतो आहे. त्याच्या आविष्कृत कलाकृतीस त्याचा स्वत:चाच आकार रूप आहे. वास्तविक दलित लेखक हा त्याच्या कलाकृतीच्या रूपाबद्दल ,घाटाबद्दल बेफिकीर

असतो. तरीही त्याची ती साहित्यकृती त्याच्या दलितत्वाच्या संवेदनातून निर्माण झालेली असते. आपल्या संवेदनातून दलित लेखक जिवंत रसरशीत अशी कलाकृती निर्माण करतो. ती त्याच्या अनुभवाचा उत्कट आविष्कार ठरते. आणि हीच तर दलित साहित्याची खरी कसोटी आहे.

दलित लेखकांचे अनुभव स्वत:चे घाट घेऊन येतील. नव्या लेखकांनी " घाटा " ची पर्वा करू नये. आपल्याला जे सांगावयाचे आहे ते जर " अर्थपूर्ण " असेल तर ते स्वत:चा "घाट" घेऊन येईल. या संदर्भात प्रा. वा.ल. कुलकर्णी म्हणतात ", दलित समाजातील नवीन लेखकाने आपण काय लिहितो, म्हणजे आपण जे लिहितो ते कथा,कादंबरी किंवा इतर " फार्म " चे रूप घेते की नाही याचा विचारच करू नये, त्याचा जो काही raw experience आहे तो इतका अर्थपूर्ण आहे की, तो कुठला फॅार्म घेतो याला माझ्यादृष्टीने महत्व नाही,त्याला फॅार्म येणारच आहे." म्हणजे दलित साहित्य जर स्वत:चा "फॅार्म" घेऊन येणार असेल तर त्याचे मूल्यांकन,त्याचा फॅार्म लक्षात घेऊनच करावे लागेल. दलित लेखकाने आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहावे. आपले " अनुभव " स्वतंत्रपणे मांडावेत. स्वातंत्र्याचे मोल दलित लेखकाने अधिक मानावे म्हणजे त्यांना आपले फॅार्म मिळू शकतील. नव्या प्रेरणेतून लिहिले जाणारे हे साहित्य त्यांनीहून वैशिष्ट चौकटीत डांबण्याचा प्रयत्न केला तर त्याचा प्राणच निघून जाऊन ते नि:सत्व झाल्याशिवाय राहणार नाही.

दलित साहित्यिकांच्या १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी भरलेल्या मेळाव्यात उद्घाटनाच्या भाषणात पु.ल. देशपांडे म्हणाले," दयेची अथवा अन्य कोणतीही अपेक्षा न बाळगता " माझे तुम्हाला ऐकावेच लागेल " अशा भक्कम समजुतीने उभ्या असलेल्या दलित साहित्यात नव्या व्यापक स्वरूपाच्या प्रबोधनाची प्रसादचिन्हे दिसत आहेत. हे साहित्य दलितांच्या

उध्दारासाठी नाही तर डबक्यांचा समाज ज्यांनी निर्माण केला त्याचा उध्दार या साहित्याला करावयाचा आहे " -- म्हणून दलित साहित्याने, दलित साहित्यिकांनी घाटाची पर्वा न करता आपल्याला जे सांगायचे आहे ते अनुभवाशी प्रामाणिक राहून सांगावे, त्या सांगण्याला आपोआपच घाट प्राप्त होऊ शकेल.

## संदर्भ,टीपा इ.


| | | |
|---|---|---|
| १. खरात शंकरराव | - | दलित वाङ्मय:प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधु प्रकाशन,पुणे,मार्च १९७८ पृष्ठ ३९. |
| २ जाधव रा.ग. | - | निळी "क्षितिजे",अमेय प्रकाशन,नागपूर ऑक्टोबर १९८२, पृष्ठ ४९. |
| ३ सरदार गं.बा. | - | प्रबोधनातील पाऊल खुणा,संपादक निर्मलकुमार फडकुले,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,पृष्ठ ११४. |
| ४ साठे आण्णाभाऊ | - | वैजयंता कादंबरीची प्रस्तावना मधून. |
| ५ जाधव रा.ग. | - | निळी पहाट, श्री विद्या प्रकाशन,पुणे, १९७८,पृष्ठ २. |
| ६ इनामदार हे.वि. | - | दलितकविता: एक दर्शन,प्रतिमा प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९८४,पुरस्कारातून. |
| ७ मनोहर यशवंत | - | स्वाद आणि चिकित्सा,धनंजय प्रकाशन नागपूर,जानेवारी १९७८,पृष्ठ ९७ |
| ८ पानतावणे गंगाधर | - | प्रबोधन,विशेषांक १९७६,पृष्ठ २६. |
| ९ कवठेकर बाळकृष्ण | - | दलित साहित्य : एक आकलन,अजब पुस्तकालय प्रकाशन,कोल्हापूर, जानेवारी १९८१,पृष्ठ २. |

१० मेश्राम केशव - अस्मितादर्श, मार्च-एप्रिल १९७०, पृष्ठ ३४.

११ रसाळ सुधीर - अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९७३, पृष्ठ १९८

१२ चिटणीस म.भि. - अस्मिता दर्श, मार्च-एप्रिल १९७७, पृष्ठ ३३

१३ पुंडलिक विद्याधर - मागोवा, दिवाळी अंक, १९७३, पृष्ठ ९१.

१४ कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य : एक आकलन, अजब पुस्तकालय प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी १९८२ पृष्ठ ११-१२.

१५ वानखेडे म.ना. - अस्मितादर्श, दिवाळी अंक, १९७०, पृष्ठ १४०.

१६ मांडे प्रभाकर - अस्मितादर्श, जाने-फेब्रु.-मार्च १९७४, पृष्ठ ५१.

१७ पानतावणे गंगाधर - अस्मितादर्श, ऑक्टो-नोव्हें-डिसें. १९७४ पृष्ठ २१

१८ जाधव रा.ग. - अस्मितादर्श, मार्च-एप्रिल १९७७

१९ कुलकर्णी वा.ल. - अस्मितादर्श, डिसेंबर १९६७, पृष्ठ ४२-४३.

२० कुलकर्णी गो.ग. - समाजप्रबोधन पत्रिका, जुलै-ऑगस्ट, १९७०, पृष्ठ ७१.


••